# प्रास्ताविक

हिंदुस्थानात फार प्राचिन काळापासून अस्पृश्यतेची अनिष्ठ प्रथा चालू असलेली दिसते. या अस्पृश्य समाजाला सामाजिक, आर्थिक व राजकीय दृष्टया न्याय मिळवुन देण्याचे प्रयत्न फार कमी झाले होते.

महात्मा जोतीबा फुले यानी सर्वप्रथम व्यापक अर्थाने मुहुर्तमेढ रोवली. १८ सप्टेंबर, १८७३ रोजी "सत्यशोधक समाज" नावाची संस्था स्थापन करुन, बहुजन समाजाला व अस्पृश्यांना संघटीत करण्याचा व त्यांना सामाजिक, आर्थिक न्याय मिळवुन देण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर १८९० साली "गोपाळ बाबा वलंगकर" या पहिल्या अस्पृश्य समाजातील व्यक्तिने "अनार्य दोष-परिहार मंडळी" नावाची संस्था स्थापन करुन अस्पृश्यांना संघटीत करण्याचा प्रयत्न केला होता.

महात्मा फुले यांच्या मृत्यूनंतर कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांनी, १९०६ "डिप्रेस्ड क्लासेस मिशन" नावाची संस्था स्थापन करुन अस्पृश्य समाजात सुधारणा करण्याचे कार्य सुरु केले होते.

महात्मा जोतीबा फुले व कर्मवीर विठ्ठल रामजी शिन्दे यांच्या कार्यापासुन प्रेरणा घेऊन छत्रपती शाहु महाराजांनी कोल्हापूर संस्थानात बहुजन समाज व अस्पृश्य यांच्या उध्दारासाठी प्रयत्न सुरु केले. त्यासाठी त्यांनी अनेक पुरोगामी कायदे तयार करुन त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी केली. त्यानी केलेल्या प्रयत्नामुळे व कार्यामुळे कोल्हापूर संस्थानात अस्पृश्य समाजातील पहिली समाजसुधारक पिढी तयार झाली. त्यात भास्कर गंगाराम कांबळे, पंजाबराव दुलस्वार, दत्तोबा पवार, डी.एस. पवार, प्रभु यल्लाप्पा कांबळे आबा सुबु गवळी इत्यादी प्रमुख कार्यकर्ते होते.

छत्रपती शाहु महाराज यांच्या प्रेरणेने डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे कोल्हापूर संस्थानात "माणगाव" या ठिकाणी २० मार्च, १९२० रोजी अस्पृश्य परिषदेसाठी आले. या परिषदेत केलेल्या शाहू महाराजांच्या भाषणामुळे डॉ. आंबेडकरांना स्फुर्ती मिळाली. त्यामुळे डॉ. आंबेडकर हे सार्वजनिक कार्यात भाग घेऊ लागले.

२० जुलै, १९२४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी "बहिष्कृत हितकारिणी सभा" या नावाची संस्था स्थापन करुन ते अस्पृश्यांची चळवळ चालवू लागले व अस्पृश्य समाजात जागृती करु लागले.

त्यानंतर, १५ ऑगस्ट, १९३६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी "स्वतंत्र मजूर पक्ष" या नावाची पहिली राजकीय संघटना स्थापन केली. परंतु या पक्षाचे कार्यक्षेत्र मर्यादित असल्याने तो संपूर्ण भारतात व कोल्हापूर संस्थानात लोकप्रिय होऊ शकला नाही.

२० जुलै, १९४२ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्ष बरखास्त करुन त्याजागी "ऑल इंडिया शेडयुल्ड कास्ट फेडरेशन" या दुस-या राजकीय पक्षाची स्थापना केली. या पक्षाला कोल्हापूर संस्थानात फार मोठा प्रतिसाद मिळाला. या पक्षातर्फे कोल्हापूर संस्थानात एस्.के. डिगे हे लोकसभा सदस्य, तर दा.म. शिर्के हे विधानसभा सदस्य झाले. त्यामुळे कोल्हापूर संस्थानात या पक्षाच्या कार्याला गती मिळाली होती.

परंतु संपूर्ण भारतीय पातळीवर या पक्षाला राजकीय क्षेत्रात मिळालेले अपयश पाहून डॉ. आंबेडकराना हा पक्ष बरखास्त करुन सर्वव्यापक असा "रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया" हा पक्ष स्थापन करावयाचा होता. परंतु

त्यांचे ६ डिसेंबर, १९५६ रोजी महापरिनिर्वाण झाल्याने त्यांना हा पक्ष स्थापन करता आला नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मृत्यूनंतर त्यांच्या अनुयायानी ३ आक्टो., १९५७ रोजी "रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची स्थापना केली. या पक्षात कोल्हापूर जिल्ह्यातील शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनमधील कार्यकर्त्यांनी प्रवेश केला.

रिपब्लिकन पक्षाचा हा उदय आणि पार्श्वभूमी पहिल्या प्रकरणात घेतलेली आहे. तर, दुसऱ्या प्रकरणात रिपब्लिकन पक्षाची घटना व रिपब्लिकन पक्षाचा एक जाहिरनामा यांचा समावेश केलेला आहे. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेला पत्राच्या जाहिरनाम्यातील काही भागाचा समावेश दुसऱ्या प्रकरणात करून रिपब्लिकन पक्षाचे स्वरूप, कार्यपध्दती कशी आहे हे विशद केले आहे. तर जाहिरनाम्यावरून रिपब्लिकन पक्षाचे उद्दिष्ट व कार्यक्रम यांचे विश्लेषण केले आहे.

तिसऱ्या प्रकरणात अखिल भारतीय क्षेत्रात व महाराष्ट्रात रिपब्लिकन पक्षाच्या स्थापनेपासून आजपर्यंत कशा प्रकारे वाटचाल केली ? याचा आढावा याप्रकरणात घेतला आहे. रिपब्लिकन पक्षात आजपर्यंत जे अनेक गट तयार झाले व त्या गटांना एकत्र आणण्याचा जो प्रयत्न झाला आणि

१) रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट)
२) अखिल भारतीय रिपब्लिकन पक्ष (गवई गट)
३) भारतीय रिपब्लिकन पक्ष (प्रकाश आंबेडकर गट)
४) रिपब्लिकन पार्टी (कांबळे गट)

या विविध गटांच्या माध्यमातून जी कार्ये करण्यात आली त्या कार्याचे स्वरूप व पध्दत या विषयीचा आढावा घेतला आहे.

तर चौथ्या प्रकरणात कोल्हापूर जिल्ह्यातील रिपब्लिकन पक्षाचा उदय व पार्श्वभूमी याचा आढावा घेतलेला आहे. यासाठी रिपब्लिकन पक्षाच्या विविध गटांच्या तर्फे आजपर्यंत केलेल्या कार्याचा आढावा घेतलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेला रिपब्लिकन पक्ष कोल्हापूर जिल्ह्यात अस्तित्वात आला का ? नसल्यास त्याला कोणती कारणे आहेत व कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व दलित, मागासलेले, भटके-विमुक्त या सर्व लोकांना रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमाने राजकीय दृष्टया कसे संघटित करता येईल याचा आढावा या प्रकरणात घेतला आहे. यासाठी कोल्हापूर जिल्ह्यातील रिपब्लिकन पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या मुलाखती घेऊन अभ्यास केला आहे.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, कोल्हापूर जिल्ह्यात हा पक्ष अकार्यक्षम दुर्बल व सामर्थ्यहिन झालेला आहे. त्यामुळे रिपब्लिन पक्षाला कोल्हापूर जिल्ह्यात सामर्थ्यवान करण्यासाठी काय करता येईल हे अभ्यासण्यासाठी "भारतीय रिपब्लिकन पक्ष उदय आणि विकास विशेष संदर्भ - कोल्हापूर जिल्हा" हा विषय एम्. फिल्. साठी निवडला.

या अभ्यासकार्यात मला माझे मार्गदर्शक डॉ. के.के. काळेकर यांचे बहुमोल मार्गदर्शन मिळाले. तसेच शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागाचे प्रपाठक डॉ. चौसाळकर सर, डॉ. लक्ष्मीनारायण, डॉ. सौ. रासम व भारती पाटील व संभाजी तोरस्कर यांचे मला सतत मार्गदर्शन मिळाले.

याशिवाय कर्मवीर हिरे महाविद्यालयातील प्राचार्य, व्ही.एल्. ठोंबरे डॉ. व्ही.आर. शिरगावे, आर.एस्. कांबळे यांनी जे सहकार्य केले यांचाही मी ऋणी आहे. तसेच माझे आई-वडिल यांच्या आशिर्वादाने व माझी पत्नी सौ. रंजना राजेंद्र कांबळे हिच्या सहकार्याने हा प्रबंध मी पूर्ण करु शकलो. विष्णूपंत साडे यांनी टंकलेखनाचे काम वेळेवर करुन दिलेबद्दल त्यांचेही आभार.